# चेतन

**नारायण धारप**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**चेतन : नारायण धारप**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**आवृत्ती**
डिसेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १६०/-

# चक्रवर्ती चेतन

## एक

एका आद्ययावत सोईंनी युक्त असलेल्या स्वयंपाकघरात एक मध्यमवयीन गृहस्थ पाकक्रियेत गढून गेला होता. त्याच्या उंचीच्या मानानं त्याची रुंदी, घेर, सगळंच अवाढव्य होतं. अर्थात त्याची हालचालही अगदी मंद गतीने होत होती. स्वयंपाकघरातून बाहेरच्या खोलीकडे जाणारं दार बंद होतं. त्या पलीकडच्या खोलीतून 'कच!' 'कच्!' आणि मध्येच ठण्! असा आवाज आला व त्या मागोमाग एखादी काचेची आणि मोठी वस्तू खळखळत फुटल्याचा आवाज झाला. स्वयंपाकात मग्न असलेल्या त्या लठ्ठ माणसावर या आवाजाचा फारसा परिणाम झालेला दिसत नाही. त्याने 'च् च्' आवाज केला, खिन्नपणे स्वत:शीच मान हलवली आणि पुन्हा तो आपल्या कामात दंग झाला.

''शंभू!'' बाहेरून कोणीतरी खूप मोठ्यानं ओरडलं. या लठ्ठ माणसानं हातातलं भांडं सावकाश खाली ठेवलं आणि गतीत कोणताही फरक न करता पावलं त्या खोलीच्या दाराकडे वळवली. दारापाशी पोहोचल्यावर सावकाश दार उघडून त्याने बाहेरच्या खोलीत डोकावून पाहिलं.

बाहेरची खोली म्हणजे एक प्रशस्त दिवाणखानाच होता. सामान भरपूर होतं; पण त्यात विविधता इतकी होती की, कशाचा कशाला मेळच नव्हता. एका बाजूस रेक्सीन-फोम रबरचा सोफा होता तर दुसऱ्या बाजूला गजाच्या सांगाड्यातील वेताची खुर्ची होती. एका भिंतीजवळ एक अद्ययावत स्टीलची बुक केस होती तर दुसऱ्या एका खिडकीजवळ एक अगदी जुन्या जमान्यातलं पण उत्तम शिसवीचं रोलटॉप डेस्क होतं. खाली लिनोलियमवर गालिचेही होते आणि व्याघ्रचर्मही होते. अशा सामानाने सजवलेल्या खोलीत तिशीच्या आतला एक तरुण उभा होता.

तो दाराजवळच्या सर्वात दूरच्या भिंतीजवळ उभा होता. त्याच्या डाव्या हातात

बरेचसे धारदार, लांब पात्याचे सुरे होते. उजव्या हातात एक सुरा घेतलेला होता.

''शंभू, तिकडे पाहा ! समोर.'' हा तरुण ओरडला.

शंभू नावाचा हा लठ्ठ माणूस खोलीत आला आणि दाखविलेल्या दिशेकडं पाहू लागला. भिंतीला बुचाचा एक बोर्ड अडकवलेला होता आणि त्यात सात-आठ सुरे रोवून बसले होते. हा विलक्षण तरुण सुरे फेकण्याची प्रॅक्टिस करीत होता, हे उघड होतं. मघाशी आलेला खळखळण्याचा आवाज त्याचा एखादा सुरा बोर्डखालच्या कपाटावर ठेवलेल्या एखाद्या काचपात्राला लागून ते फुटल्याने आला होता हे उघड होतं.

''आता आणखी काय फुटलं, मालक?'' शंभूने शांतपणे विचारलं.

''शंभू,'' त्याचा मालक म्हणाला, ''एवढं वाईट वाटून घेऊ नकोस. नाहीतरी मी त्या सौद्यात फसलोच होतो. बेल्जियम कट्‌ग्लास म्हणून त्याने माझ्या गळ्यात काहीतरी इमिटेशनच बांधलं होतं. तेव्हा जे झालं ते बऱ्यासाठीच झालं, नाही का?''

मालकाचं हे तर्कशास्त्र शंभूच्या आकलनापलीकडचं होतं. त्याने तिकडे लक्ष दिलं नाही आणि मालकाच्या विक्षिप्तपणाकडे दुर्लक्ष करण्याची शंभूची ही पहिली वेळ नव्हती, हा प्रकार रोज चालला होता- कितीतरी दिवस चालला होता- शंभूच्या मालकाचा- चेतन शास्त्रीचा- स्वभावच तसा अजब होता.

चेतनचं वय पंचवीसच्या आसपास होतं आणि दिसायला तर तो त्याहीपेक्षा कमी वयाचा दिसे. त्याचा चेहरा नितळ होता. वरवर पाहणाऱ्याला अगदी बालिश वाटे. पण चेतनचे बहुतेक वेळा लांब पापण्यांखाली अर्धवट झाकले गेलेले किंचित भुरकट रंगाचे डोळे एखाद्यावर खिळले, एखाद्याला त्यातल्या करड्या पोलादी रंगाची धार दिसली, त्यातले करारी तेज दिसले की तो ही भावना पार विसरून जाई. चेतनचा खरा स्वभाव त्याच्या करारी, पाणीदार डोळ्यांतच होता.

त्याची शरीरयष्टी किंचित कृश होती. केस बहुतेक वेळा बरेच वाढविलेले असायचे व त्याची एखाददुसरी काळी बट कपाळावर आलेली असायची.

त्याच्या परिचयातल्या लोकांना त्याचा व्यवसाय माहीत होता. एखाद्या नवख्याने चेतनला हा प्रश्न विचारायचं धाडस केलंच तर चेतन हसत हसत उत्तर देई, ''माझा व्यवसाय? मिशन एजंट !''

पण तो कोणत्या 'मिशन'वर असेल याची कोणालाही कल्पना नसायची, एवढंच काय, खुद्द चेतनलासुद्धा नसायची.

‘आयुष्य कोणत्या क्षणी तुमच्यापुढं काय उभं करील नेम नाही.’ हसत चेतन म्हणायचा, ‘माझं ब्रीद एकच आहे, कोणत्याही क्षणी तयार राहा.’

या तयार राहण्याचे अनेक किस्से शंभूने पाहिले होते आणि मनात त्याबद्दल आश्चर्य करायचं सोडून दिलं होतं. शंभूला चेतन काय करायला सांगेल याचा काही नियमच राहिला नव्हता. कधी खोलीत कोंडून ठेव, कधी खुर्चीला हातपाय गच्च आवळून बांध, (काय वाट्टेल तो हुकूम आणि या साऱ्यातून चेतन काही वेळाने तरी मोकळा व्हायचाच, हे विशेष !)

शंभूने गालिच्यावरचे काचेचे तुकडे उचलले आणि तो आत गेला. परत बाहेरच्या खोलीतून ‘कच् !’ ‘कच् !’ असे आवाज ऐकू यायला लागले.

बाहेरच्या दाराची घंटी वाजली तेव्हा हातातील काम खाली ठेवून शंभू दार उघडण्यासाठी गेला. दाराबाहेर उभा असलेला गृहस्थ पोलिसी गणवेशात होता. आता त्यांनी टोपी काढून हातात घेतली होती आणि ते हातातल्या चेनने नडगीवर बारीक बारीक वार करीत उभे होते. त्यांना बाहेर पाहून शंभूला आश्चर्य किंवा धास्ती तर वाटलेली दिसली नाहीच, उलट त्याच्या निर्विकार चेहऱ्यावर हास्याची एक क्षीणसर प्रतिमा क्षणभर उमटली.

‘‘मालक आत आहेत, घोरपडे साहेब.’’

शंभूच्या चेहऱ्यावरील हास्याचे प्रतिबिंब बाजीराव घोरपड्यांच्या चेहऱ्यावर आढळलेलं दिसलं नाही. उलट त्यांचा गडद काळा, करडा चेहरा आणखी करडा झाला. ओठ दुमडून घेत त्यांनी एकदा मान हलवली आणि ते आत शिरले. त्यांच्या बुटाचा खाड् खाड् आवाज सर्व खोल्यांमधून घुमत असला पाहिजे. बाहेरच्या दिवाणखान्यात सुराफेकीत गुंग झालेल्या चेतनच्या कानावरही गेलाच असला पाहिजे; पण घोरपडे खोलीत शिरताच तो एकदम गर्रकन त्यांच्या दिशेने वळला. त्याच्या हातातला सुरा खांद्यामागे नेलेला फेकण्याच्या तयारीत होता, तो त्याने तसाच ठेवला.

‘‘घोरपडेसाहेब ! किती घाबरवलेत तुम्ही मला ! एखादे वेळी अपघात व्हायचा ना !’’ त्याच्या ओठावरचे शब्द आणि चेहऱ्यावरचे भाव यांच्यात कोणतीच सुसंगती नव्हती. चेहऱ्यावर घाबरल्याचं चिन्ह तर मुळीच नव्हतं. भुरे, पाणीदार डोळे घोरपड्यांच्या करड्या, पोलादी नजरेवर खिळले होते. त्या भुऱ्या, मोठ्या डोळ्यात एका मिश्कील हास्याची एक पुसटशी शंका होती. ओठ किंचित विलग झाले होते. पण कोणत्याही क्षणी ते पोलादी पिंजऱ्यासारखे घट्ट मिटले असते. त्याचा उभा राहण्याचा पवित्रा

किंचित, अगदी किंचित बदलला होता... पण गेली होती त्यातली सहजता. असं वाटत होतं की क्षणिक प्रतिक्रियेसाठी त्यानं आपलं शरीर पायांच्या चवड्यांवर तोललं आहे. असं वाटत होतं की त्या उंचच उंच शरीरातील सर्व शक्ती आवळलेल्या पोलादी स्प्रिंगसारखी एकत्र आलेली आहे. एखादा चाप ओढण्याचा अवकाश की त्याचं शरीर शिकारी सावजावर मर्माघाती झेप घेईल आणि घोरपड्यांपेक्षा ही गोष्ट जास्त चांगली कोणाला माहीत असणार? कायद्याच्या रेषेच्या दोन बाजूला ते दोघेजण होते आणि गेले कित्येक दिवस त्या दोघांच्यात एक धावती लढाई चालली होती आणि घोरपड्यांच्या नजरेला तरी त्याचा अंत दिसत नव्हता आणि मनात अगदी खोल कुठेतरी, कायम दडपून ठेवलेली अशी चेतन शास्त्रीबद्दलची एक पुसटशी सहानुभूतीची भावनाही त्यांना जाणवत होती. चेतनचा धंदा काय आहे हे त्यांना पुरेपूर माहीत होतं. रक्तबंबाळ अवस्थेत, हाडं पिंजलेली, दात पडलेले, शरीर बेदम माराने काळंनिळं झालेलं असे अनेक अट्टल गुन्हेगार त्यांच्या हाती लागले होते. चेतन शास्त्रीचा उल्लेख ते दात-ओठ खाऊन करत असत... पण पुरावा? त्यांच्या शब्दाखेरीज दुसरा पुरावा? त्यांच्या शब्दांवर तर रांगत्या मुलाचाही विश्वास बसला नसता. चेतनच्या ब्लॉकची, गाडीची, गॅरेजची वेळी अवेळी अनेकदा झडती घेऊनही घोरपड्यांच्या हाती कसला धाग्याचा तुकडासुद्धा लागला नव्हता. चेतनचा यात संबंध आहे अशी मनोमन खात्री असूनही प्रत्यक्षात त्यांना काहीही सिद्ध करता आलं नव्हतं.

चेतनला काही व्यसनं असलीच तर ती विक्षिप्त होती. अंधारात उंच ठिकाणी चढायची, हिवाळ्यात नदीत पोहायचे, असले अघोरी नाद. सिगारेट ओढत असला तर तीच काय ती. दारूला स्पर्श करीत नसावा. पोरींचा शौकही नसावा आणि तो लावू नकोस. घोरपडे मनातल्या मनात म्हणत होते. कारण मग त्याच्या अभेद्य चिलखतात एक चीर पडली असती आणि मनाविरुद्ध त्याचा त्यांना उपयोग करावाच लागला असता. त्यांचे कर्तव्य ते कसं टाळणार?

आता त्याच्या हलक्या, चवड्यांवर बाणासारख्या तोललेल्या शरीराकडे आणि आत खोलवर आव्हानाची ठिणगी मिरवणाऱ्या भुऱ्या डोळ्यांकडे पाहता पाहता घोरपड्यांच्या स्मृतीत पूर्वीच्या अशा अनेक भेटी (आणि त्यांचे अटळ शेवट) येऊन गेले आणि नकळत त्यांचा आवाज ते बोलले तेव्हा तिखट आणि धारदार झाला.

''का? आज घरीच, चेतन?''

त्यांच्या कडवट आवाजाने चेतनला क्षणभर आश्चर्य वाटलं; त्यांच्या मनात काय

विचार चालले आहेत याची त्यालाही कल्पना होती. त्यांना त्यांचे कायदेशीर मार्ग सोडता येत नव्हते आणि त्याखेरीज त्यांना चेतनला हातही लावता येणार नव्हता. त्यांनीही सतत फेअर-प्लेचेच ध्येय मनासमोर ठेवले होते. त्यांच्याबद्दल चेतनला सहानुभूती अवश्य होती. त्यांच्यात वैर असलं तर ते तात्त्विक पातळीवर होतं, त्यात वैयक्तिक भाग काहीच नव्हता; पण घोरपडे निदान वरपांगी याची कधीही कल्पना देत नसत. म्हणूनच आजच्या त्यांच्या आवाजातील कटुता नवीन व आश्चर्य देणारी होती. कदाचित वरिष्ठांनी एखाददुसरा कमीअधिक शब्द (चेतनवरून !) बोलला असण्याची शक्यता होती. पण ते त्यांचं दुर्दैव होतं. त्यांच्यासाठी तो आपले जीवितकार्य कधीच सोडणार नव्हता. जे तो एका अर्धवाक्यात (फक्त शंभूला) नेहमी ऐकवीत असे. 'सुष्टांचे संरक्षण आणि दुष्टांचे निर्दालन!'

''घोरपडेसाहेब, जेवायला थांबणार का? वेळेवर आला आहात?''

''नाही.'' ते तुटक आवाजात म्हणाले.

''शंभूला सांगतो, मीठ घालू नकोस.'' चेतन पुन्हा म्हणाले.

''नाही !'' ते तितक्याच तुटक आवाजात म्हणाले.

''जशी तुमची इच्छा !'' तो उसासा टाकीत म्हणाला. ''चहा, कॉफी, एखाद्या फळाचा रस?''

त्याच्याकडे वळूनही न पाहता घोरपडे खोलीभर फिरत होते. त्यांनी हात मागे जुडी करून धरले होते आणि ते स्वत:शीच अगदी खालच्या आवाजात गुणगुणत होते; पण त्यांची पाठ वळताच एकदम तीक्ष्ण झालेली चेतनची नजर त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीवर खिळली होती. त्यांचे ताठ झालेले खांदे, हाताच्या फुगलेल्या रक्तवाहिन्या, बोटांची आवळलेली मिठी हे सर्व त्याची नजर पाहात होती. खिडकीसमोर उभे राहून ते म्हणाले, ''चेतन, गोपादादा तुला माहीत असेलच, नाही?''

खिडकीच्या काचेतून ते आपल्याकडे पाहात आहेत याची चेतनला कल्पना होती. पण आता त्याला आपल्या भावना लपविण्याची खरोखरीच काही आवश्यकता नव्हती. तो प्रांजळपणे म्हणाला,

''हो. चांगला माहीत आहे.''

''एवढ्यात भेटला होता?''

''नाही.''

''नक्की? नीट आठवून सांग !''

''नाही.'' तो हसत म्हणाला, ''आणि आता सांगा...''

''तो आज सकाळी मेलेला सापडला. त्याच्या गळ्याभोवती वाखाचा दोर आवळला होता. रस्त्याच्या कडेला, गटारापाशी त्याचं प्रेत टाकलं होतं.''

क्षणमात्र गंभीर होऊन चेतनने ही वार्ता मनात नीट साठवून ठेवली. मग त्याचा गंभीरपणा गेला, चेहऱ्यावरच्या रेषा दुमडल्या, डोळ्यात मिश्कीलपणा आला.

''घोरपडेसाहेब,'' तो हसत म्हणाला, ''जेवायच्या आधीच ही बातमी सांगायची काही आवश्यकता होती का?''

ते गर्रकन त्याच्याकडे वळले. ''चेतन !'' ते मोठ्याने म्हणाले, ''तू मला फसवू शकत नाहीस. गोपादादाचं आणि तुझं काहीतरी कारणावरून बिनसलं होतं हे मला माहीत आहे... तुझा यात कितपत संबंध आहे?''

''अजिबात नाही.'' चेतन गंभीरपणे म्हणाला, ''हे कोणाच्या कानी जाऊ देऊ नका; पण मला कोणाचा जीव घ्यायचा असला तर मी वाखाची दोरी वापरीत नाही. रेशमी दोरी चांगली. नाही का?''

''थट्टा पुरे.'' पण त्यांच्या चेहऱ्यावरचा संशय निवळला.

''घोरपडे साहेब, यात माझा काही संबंध नाही.''

''मला वाटलंच होतं.'' ते अर्धवट स्वरात म्हणाले, ''काही केल्या तुझ्या हातून असलं काही होईल यावर विश्वास बसत नव्हता. ठीक आहे. आता ते आहे आमच्या तपासाचं रुटीन.''

''मग आता जेवायला थांबणार?''

''च्यॅक्'' ते एवढंच म्हणाले आणि काही न बोलता निघून गेले.

त्यांचा हा उद्धटपणा किंवा त्यांचे गुन्ह्याचे आरोप.. चेतनने यापैकी काहीच मनावर घेतलं नाही. घोरपड्यांना ती एक प्रतिक्षिप्त सवयच लागली होती. कदाचित तिरकस मदतीचाही हा एक प्रकार असेल. गोपादादा मारला गेला होता. भूमीचा भार हलका झाला होता. पण एवढ्यानं हे संपलं नव्हतं. त्याच्या प्रतिक्रिया, त्यांचे परिणाम हे चालूच राहणार. ही चेतनला सावध राहण्याची एक अप्रत्यक्ष सूचनाही असेल. पण निदान सध्या तरी त्याचा त्याच्याशी काही एक संबंध नव्हता. खऱ्या अर्थाने त्याचे हात स्वच्छ होते. तो कोणाच्या मागावर नव्हता किंवा कोणी त्याच्या मागावर नव्हते. इतकी क्वचित येणारी वेळ की तिची नवलाई चाखत राहावी.

आज तो दिवसभर रिकामा होता.

दिवसाचा एकच कार्यक्रम होता.

संध्याकाळी त्याच्या एका डॉक्टर मित्राची भेट.

तोपर्यंत तरी तो एक सत्शील, पापभीरू, कायद्याच्या चाकोरीत काटेकोरपणे राहणाऱ्या, नाकासमोर पाहून चालणाऱ्या आदर्श नागरिकाचं जीवन जगणार होता. तोपर्यंत तरी...

मग पुढचं पुढं... पुढचं आता कोण सांगणार?

✦✦✦

# दोन

संध्याकाळी साडेसहाचा सुमार. हमरस्त्यावर तुफान रहदारी चालू होती. ऑफिसं, दुपारचे सिनेमे सुटले होते व त्यातच फिरायला जाणाऱ्यांची भर पडली होती. प्रत्येकजण स्वत:च्याच नादात, बाहेर फारसे लक्ष न देता झपाट्याने चालला होता.

मध्येच एकाएकी कोणीतरी ओरडलं...

''अरे ! अरे ! थांब... थांब...''

मोटारीचे ब्रेक एकदम लावल्याचा, रस्त्यावर टायर घासल्याचा, मोटारीच्या हॉर्नचा असे सर्व आवाज एका वेळीच आले आणि मग मोटारीचा कशाला तरी जोरात धक्का बसल्याचा आवाज आला.

एक क्षणभर सर्वत्र शांतता पसरली आणि मग मोटारीच्या धक्क्याने दूर फेकल्या गेलेल्या माणसाभोवती गर्दी जमायला लागली. काही जणांना यातलं जणू काही स्वभावत:च ज्ञान असतं. त्यांच्यातला एकजण त्या निपचित पडलेल्या आकृतीजवळ एव्हाना पोहोचलाही होता. पण त्यालाही फार उशीर झाला होता.

कारण मोटारीचा जिव्हारी मार बसून ती व्यक्ती मरण पावली होती.

लोकांची प्रवृत्ती तरी कशी असते ! तो एक फाटक्या कपड्यातला भिकारी आहे हे पाहताच सर्वांनी भराभर तेथून काढता पाय घेतला. शेवटी तेथे पोलीस पोहोचले तेव्हा जेमतेम बोटावर मोजण्याइतकी माणसं हजर होती.

ज्यांनी ज्यांनी हा अपघात पाहिला होता त्या सर्वांचे एका मुद्द्यावर एकमत झाले. ड्रायव्हरकडे अजिबात चूक नव्हती. ही जागा क्रॉसिंगची नव्हती. मागेपुढे न पाहता भिकारी एकदम रहदारीत आडवा घुसला होता. तरीही ड्रायव्हरने शिकस्त केली होती. त्याच्या एकदम थांबलेल्या टायर्सच्या खुणा पंधरा फुटांपर्यंत स्पष्ट दिसत होत्या. पोलिसांनी त्याचं नाव, लायसेन्स नंबर, पत्ता, गाडीचा नंबर हे लिहून घेऊन